NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या (तातडीच्या) १८२ व्या ऑनलाईन बैठकीचा कार्यवृत्तांत

### शुक्रवार, दि.०२ ऑगस्ट, २०२४ दुपारी ०३:०० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १८२ वी (तातडीची) ऑनलाईन बैठक **शुक्रवार, दि.०२ ऑगस्ट, २०२४ रोजी दुपारी ०३:०० वा.** मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने आयोजित करण्यात आली होती.

Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने सहभाग घेतलेले सदस्य खालीलप्रमाणे;

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य | उपस्थित |
| ७) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ९) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १०) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | अनुपस्थित |
| ११) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १३) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | अनुपस्थित |
| १५) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | प्रा. (डॉ.) विकास भाऊराव घुटे, प्र. वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| १९) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

स्वागत:

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१] | **विद्यार्थी त्याचा एक कमावता पालक व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा विमा उतरविण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात व सर्व संलग्न महाविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी त्यांचा एक कमावता पालक व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचा विमा उतरविण्यासाठी ई निवेदीची संपुर्ण प्रक्रीया करून न्यूनतम दर आसलेले टाटाएआयजी जनरल इंन्सुरंस कंपनी लिमीटेड सोलापूर या कंपनीकडे देवून मुळ प्रस्ताव विद्यार्थी विकास विभागाकडे वर्ग करण्याबाबत करण्यात आलेल्या टिपणीत नमुद केल्याप्रमाणे दराची निवदि उघडणेसाठी मा. कुलगुरु यांचेकडे दि.११/०७/२०२४ रोजी टिपणी सादर केली असता, त्यास मा. कुलगुरू यांनी मान्यता देऊन "Please check instructions from government also & then proceed" असा शेरा नमुद केला आहे. सदर शे-यास अनुसरून वित्त व लेखा विभागाकडून प्राप्त झालेल्या टिपणीत प्रस्ताव विद्यार्थी विकास विभागाचा असल्यामुळे दि.११/०७/२०२४ रोजीच्या टिपणीवर मा. कुलगुरु यांनी दिलेल्या शेऱ्याबाबत शासन सुचना तपासावी व तशी टिपणी मा. कुलगुरु यांचेकडे सादर करावी. असे नमुद केले आहे.<br>उपरोक्त बाबीस अनुसरुन स्पष्टीकरण पुढील प्रमाणे:<br>प्रस्तूत विद्यापीठाच्या स्थापनेपासून (प्रति विद्यार्थी साठी रु.१,००,०००/- तसेच अपघाती मेडीक्लेम रु.१०,०००/- व एक कमावता पालक यांच्यासाठी रु.२५,०००/-इतक्या अपघाती विम्यासाठी विद्यार्थ्यांकडून प्रति वर्षी रु.८/- ते रु.९/- प्रती विद्यार्थी इतक्या अल्पदारात अपघात विमा उतरविण्यात येत होता.<br>अ) सन २०१७-१८ या वर्षापासून (प्रति विद्यार्थीसाठी रु.१०,००,०००/- तसेच आपघाती मेडीक्लेम रु.१,००,०००/- व एक कमावता पालक यांच्यासाठी रु.२,५०,०००/-इतक्या अपघाती विम्यासाठी विद्यार्थ्यांकडून प्रतिवर्षी खालीलप्रमाणे रक्कम अकारण्यात येत होती. | विद्यार्थी विकास विभाग |

| अ क्र | कार्यान्वीत आसलेली विमा योजना | विमा कंपनीचे नाव | वार्षिक प्रिमीयम |
|---|---|---|---|
| १ | (प्रति विद्यार्थी साठी रु.१०,००,०००/- तसेच आपघाती मेडीक्लेम रु.१,००,०००/- व त्याच्या एका कमवात्या पालकासाठी रु.२,५०,०००/- इतक्या अपघाती विम्यासाठी | श्रीराम जनरल इंन्सुरंस क ली पुणे २०१७-१८ | ७९/- |
| २ | | एच डी एफ सी एर्गो जनरल इंन्सुरंस कंपनी लि. २०१८-१९ | ६८/- |
| ३ | | एच डी एफ सी एर्गो जनरल इंन्सुरंस कंपनी लि. २०१९.२० | ६८/- |
| ४ | | एच डी एफ सी एर्गो जनरल इंन्सुरंस कंपनी लि. २०२०-२१ | ७५/- |
| ५ | | टाटा. ए. आय. जी. जनरल इंन्सुरंस कंपनी लि. २०२१-२२ | ६८/- |
| ६ | | टाटा. ए. आय. जी. जनरल इंन्सुरंस कंपनी लि. २०२२-२३ | ६८/- |
| ७ | | टाटा. ए. आय. जी. जनरल इंन्सुरंस कंपनी लि. २०२३-२४ | १६०/- |
| | २०२४-२५ साठी दर | टाटा. ए. आय. जी. जनरल इंन्सुरंस कंपनी लि. २०२४-२५ | ११८/- |

ब) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांचा शासन निर्णय दि.१६/१०/२०२३: अन्वये ऐच्छिक स्वरुपात विद्यार्थी जीवन अपघात व वैद्यकीय विमा योजना "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" या नावाने लागू करण्याबाबत खालीलप्रमाणे कळविण्यात आले होते.

| अ क्र | कंपनीचे नाव | विद्यार्थी वैयक्तीक अपघात विमा १ लक्षसाठी प्राप्त न्यूनतम दर (रु) | विद्यार्थी वैयक्तीक अपघात विमा ५ लक्षसाठी प्राप्त न्यूनतम दर (रु) | विद्यार्थी वैयक्तीक वैद्यकीय विमा २ लक्षसाठी प्राप्त न्यूनतम दर (रु) |
|---|---|---|---|---|
| १ | ICICI Lombard insurance company Ltd | २० | | |
| २ | National insurance Co. Ltd | | ६२ | |
| ३ | ICICI Lombard insurance company Ltd | | | ४२२/- |

उपरोक्तनुसार महाराष्ट्र शासनाने सुचविलेल्या दराचा विचार केला असता खालीलबाबी लक्षात येतात

१. ICICI Lombard insurance company ltd यांच्या विमा योजनेत प्रति विद्यार्थी रु.२०/- इतक्या रक्कमेत केवळ रु.१,००,०००/- इतकी रक्कम वारसदारास मिळणार आहे.

२. National insurance Co. Ltd यांच्या विमा योजनेत प्रति विद्यार्थी रु.६२/- इतक्या रक्कमेत केवळ रु.५,००,०००/- इतकी रक्कम वारसदारास मिळणार आहे

३. ICICI Lombard insurance company ltd यांच्या विमा योजनेत प्रति विद्यार्थी रु.४२२/- इतक्या रक्कमेत विद्यार्थी वैयक्तीक वैद्यकीय विमा रु.२,००,०००/- पर्यंत रक्कम आपघातग्रस्तास मिळणार आहे.

| | | |
|---|---|---|
| | ४. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांचा शासन निर्णय दि.१६/१०/२०२३: अन्वये सदरची योजना ऐच्छिक स्वरुपात लागू करण्याबाबत कळविले आहे.<br><br>उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थी हे जास्तीत जास्त ग्रामीण भागातील असल्यामुळे त्याची परिस्थिती तसेच विद्यापीठाकडून ठरविण्यात आलेल्या विमा कंपनीची क्लेमबाबत (महाविद्यालयाकडून अपघात क्लेमचे कागदपत्र व्यवस्थीत प्राप्त झाल्यास केवळ सहा महिन्यात क्लेम सेटल) सेवा विचारात घेता विमा कंपनी ठरविण्याची बाब ठरविण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | १) प्रस्तुत विद्यापीठ राबवत असलेली आणि विद्यापीठ स्थापनेपासून सुरु असलेली व वेळोवेळी व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिलेली विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी विमा योजना आर्थिकदृष्ट्या परवडणारी व अधिक लाभ देणारी असल्याने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी कायम ठेवावी असे बहुमताने ठरले.<br>२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांचे शासन निर्णय, दि.१६ ऑक्टोबर, २०२३ व दि.२८ नोव्हेंबर, २०२३ नुसार लागू केलेल्या ऐच्छिक विमा योजनेसंबंधी शासनाकडून सुस्पष्ट मार्गदर्शन घेवून प्राप्त मार्गदर्शनानुसार कार्यवाही करण्याचे ठरले.<br>३) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ नुसार करण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेनुसार न्यूनतम (L-1) दर असलेले M/s TATA AIG General Insurance Co.ltd, Solapur या विमा कंपनीला पुरवठा आदेश द्यावे व सदरची बाब संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात यावा असे ठरले.<br>४) सर्व सन्माननीय सदस्यांनी विद्यार्थी हित विचारात घेवून कमी किमतीत १० लाखाचा विमा उतरविण्यास प्राध्यान्य द्यावे अशी भुमिका घेतली. सदर योजना व शासन निर्णयात नमूद योजना हे दोन्ही पर्याय विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन द्यावेत व त्यावर विद्यार्थ्यांनी ऐच्छिकरित्या कोणता विमा घ्यावा हे विद्यार्थ्यांवर सोपवावेत असे ठरले.<br>५) उपरोक्त १ ते ४ प्रमाणे ठराव बहुमताने पारीत करण्यात आला. तथापि, याविषयी शासन निर्णयानुसार कार्यवाही करणे उचित राहील असे डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर यांनी मत नोंदविले. | |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद